महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीला आवाजी मतदानाने मुदतवाढीचे अभय

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीला आवाजी मतदानाने गुरुवारी मुदतवाढीचे अभय मिळाले. हा कायदेशीर ठराव फेटाळता येत नसला, तरी आगामी दोन वर्षांत निवडणुका घेण्यात याव्यात, असा आदेश परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांनी कार्यकारिणीला दिला.

करोना प्रादुर्भावामुळे लांबणीवर पडलेली परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झाली. परिषदेचे कार्यकारी विश्वस्त उल्हास पवार, उपाध्यक्ष चंद्रकांत शेवाळे, कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे आणि कोशाध्यक्षा सुनीताराजे पवार यांच्यासह आजीव सभासद या बैठकीस उपस्थित होते.

विद्यमान कार्यकारिणीला पाच वर्षांची मुदतवाढ मिळावी, या कार्यकारिणीने एकमताने संमत केलेला प्रस्ताव मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला. त्यावर अडीच तास वादळी चर्चा झाली. काही वेळा तर सदस्य हमरीतुमरीवर आले होते. मात्र, आवाजी मतदान घेत पाच वर्षांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

डॉ. कसबे म्हणाले, सर्वसाधारण सभेने संमत केलेला ठराव कायदेशीर असल्याने तो फेटाळून लावण्याचा अधिकार मला नाही. मात्र, ठराव कायदेशीर असला तरी नैतिक आहे का हा पेच मला पडला आहे. कार्यकारिणीने पाच सदस्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करावी. परिस्थिती पूर्वपदावर येते की नाही या संदर्भात समितीने दर सहा महिन्यांनी आपला अहवाल कार्यकारिणीला सादर करावा. ही समिती दोन वर्षांच्या कालावधीसाठी काम करेल. निवडणुका घेण्याबाबत समितीचा अहवाल आल्यावर त्याची अंमलबजावणी न केल्यास मी अध्यक्षपदी राहणार नाही.

पिंपरीत करोनाबाधित रुग्णांची संख्या एक लाखावर, करोनामुक्त ९६ हजार

सक्रिय रुग्णसंख्येत घट, मृत्युसंख्या नियंत्रणात

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहरातील करोनाबाधित रुग्णांच्या संख्येने गुरुवारी (२८ जानेवारी) एक लाखाचा आकडा ओलांडला. त्याचवेळी, उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांची संख्याही ९६ हजारांहून अधिक झाली आहे. शहरातील सक्रिय रुग्णसंख्या घटली असून मृत्यूचे प्रमाण नियंत्रणात आहे.

- पिंपरीतील एकूण रुग्णसंख्या - एक लाख १४ (२८ जानेवारी २०२१ पर्यंत)
- उपचार होऊन बरे झालेले - ९६ हजार ४४४
- मृत्युसंख्या (एकूण) - २,५६३
- पालिका हद्दीतील - १८०४
- हद्दीबाहेरील - ७५९

राज्यशासनाने टप्प्याटप्प्याने निर्बंध शिथिल केले, त्यानंतर मोठ्या संख्येने नागरिक घराबाहेर पडू लागले होते. बहुतांश नागरिकांकडून आरोग्यनियम पाळले जात नव्हते.

तसेच, आवश्यक खबरदारी बाळगली जात नव्हती. त्यामुळे करोनाबाधितांची संख्या वाढण्याची शक्यता पालिकेकडून वर्तवण्यात येत होती. सुदैवाने, शहरातील करोना रुग्णसंख्येची वाढ मर्यादित स्वरूपात राहिली आहे. गेल्या वर्षी ११ मार्चला शहरात करोनाचा पहिला रुग्ण आढळला. तर, पहिला मृत्यू १२ एप्रिलला झाला. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात करोनाचा प्रादुर्भाव वाढला होता. मात्र, ऑक्टोबरनंतर टप्प्याटप्प्याने परिस्थिती सुधारत गेली. काही दिवसांपासून करोनाबाधितांची संख्या अत्यंत कमी झाल्याचे दिसून येते. गुरुवारी करोनाच्या एकूण रुग्णसंख्येने एक लाखाचा आकडा ओलांडला. तसेच, उपचारानंतर बरे झालेल्यांची संख्या ९६ हजारांपुढे गेली आहे. करोना आपल्यातून पूर्णपणे गेलेला नाही, असे सांगत महापालिकेने नागरिकांना खबरदारी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

Surendera Dental College
H. H. Gardens, Sri Ganganagar, Raj.-335001
A Post Graduate Institute with Best Staff & Infrastructure in the Region
ADMISSION
BDS 2020 (LAST FEW SEATS)
MDS 2021 (ALL 9 STREAMS)
Eligibility NEET Qualified
www.sdcri.in | Email: gorav@sgi.org.in
9413385160, 9829076116, 9414210253

पं. भीमसेन जोशी जन्मशताब्दीनिमित्त विद्यापीठाकडून विविध उपक्रम

व्यवस्थापन परिषदेचा ठराव

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. विद्यापीठातील भीमसेन जोशी अध्यासन आणि ललित कला केंद्राच्या माध्यमातून कार्यक्रम करण्याचा ठराव व्यवस्थापन परिषदेने केला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची गुरुवारी बैठक झाली. त्यात विविध प्रशासकीय विषयांवर चर्चा झाली.

२०२१-२२ हे पं. भीमसेन जोशी यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने या वर्षभरात कार्यक्रम आयोजित करण्याचा ठराव व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांनी मांडला. या ठरावावर चर्चा होऊन वर्षभरात कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

माजी विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी जोडण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ

विद्यापीठाचे माजी विद्यार्थी जगभरात विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. या विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी जोडण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्याचाही ठराव मांडण्यात आला. या ठरावालाही मान्यता देण्यात आली.

पांडे म्हणाले, 'विद्यापीठातील भीमसेन जोशी अध्यासन आणि ललित कला केंद्राच्या माध्यमातून पं. भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विविध उपक्रम राबवता येऊ शकतात. या कार्यक्रमांतून पं. भीमसेन जोशी यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाला अभिवादन करण्यात येईल. या कार्यक्रमांचे नियोजन येत्या काळात केले जाईल.'

पुण्यात २२४, पिंपरीत ११० नवे रुग्ण

जिल्ह्यात नऊ रुग्णांचा मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

- पुणे - २२४ नवे रुग्ण, चार मृत्यू
- पिंपरी-चिंचवड - ११० नवे रुग्ण, चार मृत्यू
- उर्वरित जिल्हा - २२३ नवे रुग्ण, एक मृत्यू

पुणे : गुरुवारी जिल्ह्यात करोनाच्या ५५७ नवीन रुग्णांची नोंद झाली. त्यामुळे जिल्ह्यातील रुग्णसंख्या ३ लाख ७७ हजार ९३४ झाली आहे. दिवसभरात जिल्ह्यात नऊ रुग्णांचा करोनाने मृत्यू झाला असून, मृतांची एकूण संख्या ९०३६ झाली आहे.

दिवसभरात आढळलेल्या ५५७ रुग्णांपैकी २२४ रुग्ण पुणे शहरातील आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात ११० जणांना करोनाची लागण झाली आहे. पुणे जिल्ह्याच्या उर्वरित भागात २२३ नवे रुग्ण आढळले आहेत. पुणे शहरातील चार, पिंपरी चिंचवडमधील चार आणि ग्रामीण भागातील एका रुग्णाचा करोनाने मृत्यू झाला आहे. पुणे शहरात १४९ रुग्ण बरे होऊन घरी गेले असून शहरातील बरे झालेल्या रुग्णांची संख्या १,७८,५९१ झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील ४६ रुग्ण गुरुवारी बरे होऊन घरी गेले.

HYDERABAD (SIND) NATIONAL COLLEGIATE BOARD'S
PRIN. K. M. KUNDNANI COLLEGE OF PHARMACY
(Govt-Aided, Minority (Sindhi), PCI, AICTE Approved, NBA Accredited and Affiliated to University of Mumbai)
Plot No. 23, Jote Joy Building, Rambhau Salgaonkar Marg, Cuffe Parade, Mumbai- 400 005
Website: https://kmkcp.edu.in/ Contact No. 022-22164368 Email id- kmkcp@rediffmail.com

DTE CODE: 3015
ADMISSION NOTICE FOR INSTITUTE LEVEL ROUND
B.PHARM & M.PHARM COURSE (2020-2021)

Applications are invited for admission to First Year B. Pharm., Direct Second Year B. Pharm and First Year M. Pharm course for Institute Level Round for filling the vacancies if any. Forms can be downloaded from the website or taken from college office and submitted in person in college. For details, visit our website https://kmkcp.edu.in/

SCHEDULE OF ADMISSION PROCEDURE

1.	Issue and submission/Receipt of Application forms	Dates : 30.01.2021, 01.02.2021 to 03.02.2021 Time : 10:00 am. to 05:00 pm.
2.	Provisional Merit List	04.02.2021 – 11.00 am.
3.	Grievance	04.02.2021 – 11.00 am. 04.02.2021 - 5.00 pm.
4.	Final Merit list	04.02.2021 – 6.00 pm.
5.	Counseling and Admission	Reporting – 05.02.2021 at 12.00 noon Admission : 12.30

The eligibility and other admission rules as per the CETCELL information brochure 2020-2021.

(Sd/-)
PRINCIPAL
Prin. K. M. Kundnani College of Pharmacy.

एएमजे लँड होल्डिंग्ज लिमिटेड
सीआयएन : एल२१०१२एमएच१९६४पीएलसी०१३०५८
नोंदणीकृत कार्यालय: थेरगाव, पुणे - ४११ ०३३.
दूरध्वनी: ०२०-३०६१ ३३३३, फॅक्स: ०२०-३०६१३३८८
संकेतस्थळ: www.amjland.com ई-मेल: admin@amjland.com

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ४७ यासह वाचल्या जाणाऱ्या नियम २९ च्या अनुषंगाने द्वारे सूचना देण्यात येत आहे की, दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी मर्यादित समीक्षण अहवालाच्या सह कंपनीचे स्वतंत्र व एकत्रिकृत अलेखापरिक्षित वित्तिय निष्कर्ष आणि अन्य बाबी विचार करून संमत करण्यासाठी एएमजे लँड होल्डिंग्ज लिमिटेडच्या संचालक मंडळाची सभा **शनिवार, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२१** रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सदर सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर देखील म्हणजेच **www.amjland.com**, वर आणि कंपनीच्या समभाग सूचीबध्द असलेल्या स्टॉक एक्स्चेंज म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या (**www.bseindia.com** आणि **www.nseindia.com**) संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

सेबी (प्रोहिबिशन ऑफ इनसाईडर ट्रेडिंग) नियमावली, २०१५ च्या मान्यतेच्या अनुसार आणि कंपनीच्या इनसाईडर ट्रेडिंग धोरणाच्या नियमांच्या अनुसार समभागधारकांच्या मध्ये व्यवहार करणारी खिडकी ०१ जानेवारी २०२१ पासून कंपनीच्या वित्तिय निष्कर्षाची घोषणा झाल्यानंतर ४८ तासांपर्यंत म्हणजेच ०८ फेब्रुवारी २०२१ (दोन्ही दिवस धरुन) पर्यंत बंद ठेवण्यात येईल.

एएमजे लँड होल्डिंग्ज लिमिटेड, करिता
सही/-
श्रीहरी वायचाळ (कंपनी सचिव)
स्थळ : पुणे
दिनांक : २९ जानेवारी, २०२१

ग्रॅव्हिस हॉस्पिटॅलिटी लिमिटेड
सीआयएन : एल५५१०१पीएन१९५९पीएलसी०१२७६१
नोंदणीकृत कार्यालय : डेअरी टॉप्स, जे-१७७, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रियल ईस्टेट, भोसरी, पुणे-४११ ०२६ फोन : ०२२-६२५१३१३१,
ईमेल आयडी : investors.relations@gravissgroup.com
वेबसाईट : www.gravisshospitality.com

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ४७ यासह वाचलेल्या रेग्युलेशन २९ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की ३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या तिसऱ्या तिमाहीकरिता कंपनीचे अलेखापरिक्षित स्वतंत्र व एकत्रीकृत वित्तिय निष्कर्ष, इतर गोष्टींसमवेत, विचारात घेण्याकरिता आणि मान्य करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची मंगळवार, ०९ फेब्रुवारी, २०२१ या घेण्यात येणार आहे.

उक्त सूचना *http://www.gravisshospitality.com* या कंपनीच्या वेबसाईटवरुन आणि *http://wwwbseindia.com* या स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवरुनसुद्धा प्राप्त करता येईल.

वरील सूचनेच्या अनुसार ट्रेडिंग विंडो ०१ जानेवारी, २०२१ पासून, इन्साईडर ट्रेडिंगच्या प्रतिबंधाकरिता कंपनीच्या आचारसंहितेअंतर्गत येत असलेल्या सर्वांकरिता बंद ठेवण्यात येईल आणि ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी निकाल जाहीर झाल्यानंतर ४८ तासात उघडण्यात येईल.

मंडळाच्या वतीने आणि करिता
स्वाक्षरी/-
कैनाझ भरुचा
कंपनी सचिव
स्थळ : मुंबई
तारीख : २८ जानेवारी, २०२१

Bharatiya Vidya Bhavan's
SARDAR PATEL INSTITUTE OF TECHNOLOGY (S.P.I.T.)
Autonomous Institute under University of Mumbai
Munshi Nagar, Andheri (West), Mumbai – 400 058.

Admission for Vacant Seats After CAP 2020-21

Institute invites online applications for admissions to B.Tech., Direct Second Year, M.Tech. and MCA against vacancies if any after CAP rounds. Vacancies will be displayed on the website. Please visit our website **www.spit.ac.in** for details.
Application form submission: 29-1-2021 to 31-1-2021 up to 12:00 noon.
Note: Candidates who have already applied against our earlier notification for Institute Level seats / After CAP vacancies, need not apply again.
Sd/-
PRINCIPAL

घनदाट मुलायम केसांसाठी तन्वी हेअरकेअर किट
1 तन्वीशता, 1 अश्वयष्टी, 1 तन्वीगोरेक्स टॅबलेट्स घ्या.
केशबला तेलाने डोक्याला मसाज आठवड्यातून 2 वेळा करा.
तन्वी अँटी डँड्रफ शॅम्पूने आठवड्यातून 2 वेळा केस धुवा.
तन्वी व्हॉट्सअॅप मोफत आरोग्यसल्ला डॉ मेधा : 7045589981 डॉ मानसी : 9769905892
संध्याकाळी ५ ते ६ डॉक्टरांचा फोनवर सल्ला घ्या.डॉ. रूचा : 9920975892
तन्वी उत्पादने www.tanviherbals.com वेबसाईटवर ऑनलाईन,
केमिस्टकडे, तन्वी क्लिनिक्समध्ये उपलब्ध For Home Delivery : 9820075813
तन्वी क्लिनिक - फ्री चेकअप - घंटाळी ठाणे : 9769695892, तन्वी दादर : 9833683621
वितरक : मुंबई : 9594073030 / 9892873319, पुणे : 8796021003, महाराष्ट्र : 9819529762
तन्वी संचालक : 9833001716 | Follow Us On : Facebook & Youtube

मत्तेची ऑनलाईन ई-निविदा विक्री

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : 27 बीकेसी, सी 27, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड - 400051
शाखा कार्यालय : न्याती युनीट्री, चौथा मजला, झोन-II, पुणे-नगर हायवे, येरवडा, पुणे - 411006

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) सह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(5) अंतर्गत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या अचल मत्तांचा **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड म्हणजे सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दि. 29/01/2020** रोजी ताबा घेतलेला असून तिची **श्री उदयकांत भगवानदास सुराणा, श्रीमती कल्पना उदयकांत सुराणा आणि श्री रौनक उदयकांत सुराणा** यांचेकडून सुरक्षित धनको कोटक महिंद्रा बँक लिमिटेड यांना कर्ज खाते क्र. पीआर00361052 अंतर्गत दि. 21/01/2021 रोजीनुसार येणे असलेल्या रु. 97,20,307/- (रुपये सत्त्याण्णव लक्ष वीस हजार तीनशे सात फक्त) अधिक वसुलीच्या दिनांकापर्यंतच्या करारातील दराने लागू व्याजाच्या वसुलीसाठी दि. **दि. 03/03/2021 रोजी दु. 12.00 ते 01.00 वाजेपर्यंत प्रत्येकी 5 मिनिटांच्या** अमर्याद कालविस्तारांसह ''जशी आहे, जेथे आहे'',''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किमत रु. 1,17,00,000/- (रुपये एक कोटी सतरा लक्ष फक्त) आणि बयाणा रक्कम **रु. 11,70,000/-** (रुपये अकरा लक्ष सत्तर हजार फक्त) असेल आणि केवायसीसह बयाणा रक्कम सादर करण्याचा शेवटचा दिनांक आहे **02/03/2021 रोजी सायं. 7:00 वाजेपर्यंत (भाप्रवे).**
मालमत्तेचे वर्णनः **सदनिका क्र. 102, पहिला मजला**, स.क्र. 33, हिस्सा क्र. 1/30, तालुका हवेली, उप-निबंधक हवेली आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकारक्षेत्रात, संजीवनी ''अमलताश'' बिल्डींगसमोर, मिटकॉन कॉलेज आणि वुड्स बिल्डींगजवळ, बालेवाडी गाव, पुणे.
सदनिका क्र. 201, दुसरा मजला, स.क्र. 33, हिस्सा क्र. 1/30, तालुका हवेली, उप-निबंधक हवेली आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकारक्षेत्रात, संजीवनी ''अमलताश'' बिल्डींगसमोर, मिटकॉन कॉलेज आणि वुड्स बिल्डींगजवळ, बालेवाडी गाव, पुणे.
सदनिका क्र. 301, तिसरा मजला, स.क्र. 33, हिस्सा क्र. 1/30, तालुका हवेली, उप-निबंधक हवेली आणि पुणे महानगर पालिकेच्या अधिकारक्षेत्रात, संजीवनी ''अमलताश'' बिल्डींगसमोर, मिटकॉन कॉलेज आणि वुड्स बिल्डींगजवळ, बालेवाडी गाव, पुणे.
अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग 8 कडे वेधण्यात येते. कर्जदार आणि सर्व लोकांनी लक्षात घ्यावे की कुठल्याही कारणास्तव सदर लिलाव अयशस्वी झाल्यास सुरक्षित धनकोस खाजगी तहाद्वारे अनामतीवर कारवाई करण्याचा अधिकार असेल.
विक्रीसाठी काढण्यात आलेल्या मत्तांच्या संदर्भात काही खुलासा/आवश्यकता असल्यास बोलीदारांनी कृपया राजेंद्र दहिया (+91 8448264515), श्री आकाश सक्सेना (+91 8860001910), श्री पंकज राय (+91 7768003567) आणि प्रियांका अगरवाल (+91 9850527020) यांचेशी संपर्क साधावा. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया कोटक महिंद्रा बँकेची वेबसाईट म्हणजे ***https://www.kotak.com*** येथे दिलेली लिंक ***https://www.kotak.com/en/bankauctions.html*** आणि/किंवा ***https://kotakbank.auctiontiger.net*** पहावे.

स्थान: पुणे
दिनांक: 28.01.2021
प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

एस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय : मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्लाह सयानी रोड, एस. टी. डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.
ई-मेल : info@ahfcl.com **सीआयएन :** U65923MH2013PLC248741
शाखा कार्यालय : शॉप नं - ६, तळ मजला, विश्वा अर्केड, नवाळे ब्रिज जवळ, नेर्हे, पल्स हॉस्पीटल, कर्जत - ४१००४६., महाराष्ट्र
मोबाईल नं : श्री. विनित साळुंखे - ०९३२४९३५१८४

लिलावासह विक्रीसाठी जाहीर सूचना

खाली वर्णन करण्यात आलेल्या रक्कमेच्या वसुलीकरिता सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स् अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये एस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या तारण मालमत्तेचा कब्जा घेतल्यानुसार, खाली वर्णन करण्यात आलेल्या, ज्याचा प्रत्यक्ष कब्जा घेतला असून, त्या स्थावर मिळकतीच्या खरेदीसाठी निम्नस्वाक्षरीकारांनी मोहोरबंद लिफाफ्यातून प्रस्ताव मागवले आहेत. खाली देण्यात आलेले तपशील **'जे आहे जसे आहे', 'जे आहे जेथे आहे', जे आहे तेथे आहे** या तत्वावर.

कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदार	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	गहाण मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत (आरपी)	इसारा अनामत रक्कम (इएमडी)(आरपीच्या १०%)
(कर्ज करार क्र. **LXDAU00415-160021623**/ दौंड शाखा) **रमेश रामचंद्र वाघमारे** (कर्जदार) **सविता रमेश वाघमारे** (सहकर्जदार)	२४-०८-२०१७ रोजीस रु. २४,३५,७१०/- (रुपये चोवीस लाख पस्तीस हजार सातशे दहा मात्र)	फ्लॅट नं . ए-३, १ला मजला, विश्वानंदा अपार्टमेंट १७३/३/७, साखरे शो रूमच्या मागे, गोपाळ वाडी रोड भवानी नगर, साखरे शो रूमच्या मागे, पुणे महाराष्ट्र - ४१३८०१	रु. १६,५०,०००/- (रुपये सोळा लाख पन्नास हजार मात्र)	रु. १,६५,०००/- (रुपये एक लाख पासष्ठ हजार मात्र)

१. **मोहोरबंद बोली/प्रस्ताव दाखल करण्याची शेवटची तारीख** यावर नमूद शाखेच्या कार्यालयीन पत्त्यावर **०२-०३-२०२१ रोजी सकाळी ११.०० पर्यंत** इएमडी आणि केवायसीसह दिलेल्या बोली प्रपत्रामधील पूर्ण न भरलेल्या, निविदा आणि अंतिम तारखेनंतर मिळालेल्या निविदा अवैध मानल्या जातील आणि त्याप्रमाणे रद्द केल्या जातील. त्यावर कोणतेही व्याज प्रदान केले जाणार नाही.
२. **बोली/प्रस्ताव उघडण्याची तारीख (लिलाव तारीख)** वरील नमूद शाखेच्या कार्यालयीन पत्त्यावर **दि. ०२-०३-२०२१** रोजी **दुपारी २.०० वा. ते ३.०० वा.** आहे. निविदा अधिकृत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील.
३. **स्थावर मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख ०४-०२-२०२१ रोजी स. ११.३० ते दु. ४.०० वा.**
४. सूचनेमधील थकीत रक्कमेवरील कर्ज करारपत्राप्रमाणे प्रयोज्य पुढील व्याज लावण्यात येईल आणि वसुलीपर्यंत अनुषंगिक खर्च, परिव्यय इ. चे थकीत आणि भरणायोग्य राहील.
५. कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, त्यांनी विक्रीच्या वेळी स्वत: उपस्थित राहावे आणि ते विक्रीच्या अटी आणि शर्तींच्या तपशिलाप्रमाणे यावर विक्षेपित स्थावर मिळकतीच्या खरेदीकरिता इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना आणू शकतात.
६. **कर्जदार/हमीदार यांना लिलावाच्या तारखेआधी वर उल्लेख केलेल्या रक्कमेचे देय करण्यासाठी सरफेसी अॅक्ट २००२ अंतर्गत ३० दिवसांची विक्री सूचना देण्यात येते.** कसूर केल्यास स्थावर मिळकतीचा लिलाव केला जाईल आणि थकबाकी असल्यास व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. कर्जदाराने एस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. ला थकीत असणाऱ्या रकमेचे संपूर्ण देय विक्रीच्या आधी केले तर लिलाव थांबवण्यात येईल.
७. दिलेल्या टेंडर प्रपत्रामध्ये विक्री लिलावाच्या अटी आणि शर्ती अंतर्भूत आहेत. वर उल्लेख केलेल्या सर्कल ऑफिसमध्ये टेंडर प्रपत्रे उपलब्ध आहेत.
८. उच्चतम निविदाकाराला स्थावर मिळकतीची विक्री करण्यात येईल. तथापि, अधिकृत अधिकारी आवश्यकता असल्यास अंतर्गत बोलीसाठी परवानगी देण्याचे आपले अधिकार राखून ठेवत आहेत. राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीत उल्लेख केलेल्या मिळकतीची विक्री केली जाणार नाही.
९. कोणताही सर्वोत्तम बोली प्रस्ताव स्विकारण्यास अधिकृत अधिकारी बांधील नाहीत आणि कोणत्याही क्षणी कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्विकारणे किंवा नाकारणेचा संपूर्ण अधिकार आणि तसेच कोणतेही कारण न देता लिलाव विक्री स्थगित करणे/पुढे नेणे/रद्द करणे किंवा पुनर्लिलाव आयोजित करणेचा अधिकार अधिकृत अधिकाऱ्यांकडे राखीव आहे.
१०. वर उल्लेख केलेल्या मिळकतीवर कोणत्याही प्रकारचे दायित्व असल्यास त्यास एएचएफसीएल जबाबदार राहणार नाही. **'जे आहे जेथे आहे', 'जे आहे जसे आहे', 'जे आहे तेथे आहे'** या तत्त्वावर लिलाव केला जाईल.
११. कर्ज थकीत रक्कम ही कर्ज समाप्तीची रक्कम नाही. कर्ज समाप्तीच्या वेळी (जर काही) बदल असल्यास तर ते सुचवण्यात येईल.
१२. **'एस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड'** च्या नावानेच डिमांड ड्राफ्ट बनवावे.
१३. आमचे पोर्टल **https://motilaloswalhf.com/eauction-pdf** यावर प्रकाशित केले गेले आहे.

पुढील तपशिलासाठी, अधिकृत अधिकाऱ्यांशी वर नमूद कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा.

स्थान : महाराष्ट्र
दिनांक : २९-०१-२०२१
स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
एस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. करिता
*भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

Public Notice

ICICI Prudential Life Insurance Company Limited
CIN: L66010MH2000PLC127837
Registered office: 1089, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400025 (Reg. No. 105 dated 24.11.2000)
Ph: 022-40391600, **Fax:** 022-24376638, **Email:** ir@iciciprulife.com, **Website:** www.iciciprulife.com

Consolidated Financial Result

(₹ in lakhs)

Sr. No	Particulars	Three months ended/at December 31, 2020 (Audited)	Three months ended/at December 31, 2019 (Audited)	Nine months ended/at December 31, 2020 (Audited)	Nine months ended/at December 31, 2019 (Audited)	Year ended/at March 31, 2020 (Audited)
1	Premium Income (gross)[1]	915,204	826,365	2,363,222	2,278,370	3,343,070
2	Net Profit / (Loss) for the period (before tax, Exceptional and / or Extraordinary items)	32,536	30,306	96,501	89,608	106,698
3	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and / or Extraordinary items)	32,536	30,306	96,501	89,608	106,698
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items)	30,430	30,177	89,364	88,825	106,698
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)][2]	NA	NA	NA	NA	NA
6	Paid up equity share capital	143,590	143,585	143,590	143,585	143,586
7	Reserves (excluding revaluation reserve)	696,847	589,445	696,847	589,445	607,357
8	Earnings per share (face value of ₹ 10/- each)					
	(a) Basic (not annualised for three/nine months) (in ₹)	2.12	2.10	6.22	6.19	7.43
	(b) Diluted (not annualised for three/nine months) (in ₹)	2.12	2.10	6.22	6.18	7.42

Key numbers of Standalone Audited Results of the Company are as under :

(₹ in lakhs)

Sr. No	Particulars	Three months ended/at December 31, 2020 (Audited)	Three months ended/at December 31, 2019 (Audited)	Nine months ended/at December 31, 2020 (Audited)	Nine months ended/at December 31, 2019 (Audited)	Year ended March 31, 2020 (Audited)
1	Premium Income (gross)[1]	915,204	826,365	2,363,222	2,278,370	3,343,070
2	Profit before tax	32,660	30,375	96,773	89,709	106,875
3	Profit after tax	30,555	30,246	89,636	88,926	106,875
4	Total Comprehensive income[2]	NA	NA	NA	NA	NA

[1] Premium income is gross of reinsurance and net of goods & service tax
[2] The new Indian Accounting Standards (Ind AS) are currently not applicable to Insurance companies in India.

Note: The above is an extract of the detailed format of quarterly financial results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly financial results are available on the Stock Exchange websites (www.nseindia.com and www.bseindia.com) and the Company's website (www.iciciprulife.com).

For and on behalf of Board of Directors
N. S. Kannan
Managing Director & CEO
DIN:00066009

Mumbai
January 27, 2021

Protect your loved ones the smart way, with our all-in-one term plan
Key benefits*
Life Cover + Critical Illness[1] Benefit (optional) + Accidental[2] Death Benefit (optional)
This plan also covers COVID-19 life claims[3]

*All in one plan is an all inclusive plan. [1]The Accelerated Critical Illness Benefit (ACI Benefit) is available only under Life and Health and All in One Options. This benefit is an accelerated benefit and the death benefit will be reduced by the critical illness cover paid to the policyholder. [2]Accidental Death Benefit is available in Life Plus and All in One options. Accidental Death benefit is up to ₹ 2 Crores (Subjected to underwriting guidelines). [3]Covid-19 life claims are only applicable in case of death. For more information on Accelerated critical illness and accidental death benefit please refer policy document or brochure. Reg. Off.: ICICI PruLife Towers, 1089 Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai 400025. Customer helpline number - 1860 266 7766. IRDAI Regn no. 105. CIN: L66010MH2000PLC127837. For more details on risk factors, terms and conditions, please read sales brochure carefully before concluding a sale. UIN: 105N151V06. ADVT No.: L/II/2179/2020-21

BEWARE OF SPURIOUS / FRAUD PHONE CALLS! IRDAI is not involved in activities like selling insurance policies, announcing bonus or investment of premiums. Public receiving such phone calls are requested to lodge a police complaint.